अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । गुरुवार
२०.०८.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २०१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## देशातील दळणवळणाचा चेहरा बदलणार! १३,०४१ कोटींच्या ५ महाप्रकल्पांना केंद्राची मंजुरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत दळणवळण व्यवस्थेला मोठी गती देण्यासाठी १३,०४१ कोटी रुपयांच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या पॅकेजमध्ये देशातील रेल्वे संपर्क अधिक भक्कम करणे आणि शेजारील देशांशी सीमाभागातील व्यापार सुलभ करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

केंद्रीय रेल्वे आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयांची माहिती देताना सांगितले की, या निधीतून ४ महत्वाच्या रेल्वे मार्गांचा विस्तार आणि बिहारमधील १ मुख्य चारपदरी महामार्ग तयार केला जाणार आहे.




**भारत-नेपाळ व्यापारासाठी बिहारमध्ये ३,५११ कोटींचा महामार्ग**

बिहारमधील सीमावर्ती भागात रस्त्यांचे मोठे जाळे निर्माण करण्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे:

**८२.६ किमी लांबीचा मार्ग:** मुझफ्फरपूर ते सीतामढी मार्गे सोनवर्षापर्यंत जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे पूर्णपणे चार पदरीकरण केले जाईल.

**सीमेवरील दळणवळण सुलभ:** हा महामार्ग थेट नेपाळच्या सीमेपर्यंत पोहोचत असल्याने व्यापारी मालवाहतूक अधिक जलद होईल.

**प्रकल्पाची किंमत:** या संपूर्ण रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सरकारने ३,५११ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

**हावडा-चेन्नई मुख्य रेल्वे मार्गाची क्षमता वाढणार**

देशातील सर्वाधिक व्यस्त मानल्या जाणाऱ्या ७ मुख्य ट्रंक रूट्सपैकी हावडा-चेन्नई मार्गावर वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी ४ नव्या रेल्वे लाईन प्रकल्पांना गती देण्यात आली आहे:

**खरगपूर ते भद्रक विस्तार:** पश्चिम बंगाल आणि ओडिशादरम्यानच्या १७३ किमी अंतरासाठी ३,३५२ कोटी रुपये खर्चून काम केले जाईल, ज्यात ४१ मोठे आणि १६९ लहान पूल बांधले जातील.

## महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालवायची असेल तर मराठी बोललीच पाहिजे!

### राज्य सरकारचा मोठा निर्णय; मराठी न आल्यास थेट परवाना रद्द होणार!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रात ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी चालवणाऱ्या परप्रांतीय व स्थानिक चालकांबाबत राज्य शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कठोर निर्णय घेतला आहे. यापुढे मराठी भाषा न जाणणाऱ्या चालकांना महाराष्ट्राच्या रस्त्यांवर ऑटो किंवा टॅक्सी चालवता येणार नाही. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भात अधिकृत घोषणा केली असून, या नियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी २० ऑगस्टपासून राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, सुरुवातीला भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांवर थेट दंडात्मक कारवाई न करता त्यांना सुधारण्याची संधी दिली जाणार आहे. तपासणीदरम्यान ज्या चालकांना मराठी भाषा येत नसल्याचे निदर्शनास येईल, त्यांना प्रथम कायदेशीर नोटीस बजावण्यात येईल. नोटीस मिळाल्यापासून पुढील ३ महिन्यांच्या कालावधीत त्यांना मराठी भाषा शिकणे बंधनकारक असेल. या ३ महिन्यांच्या मुदतीनंतरही जर संबंधित चालकाने मराठी भाषेचे ज्ञान संपादन केले नाही, तर त्याचा वाहन चालक परवाना (लायसन्स) थेट निलंबित करण्यात येईल, असा इशारा मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

ही तपासणी मोहीम संपूर्ण राज्यभरात महिनाभर तीव्र गतीने राबवली जाणार आहे.

या विशेष मोहिमेच्या नियोजन आणि अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाची (ठढज) विशेष भरारी पथके राज्यभरातील कानाकोपऱ्यात जाऊन ऑटो आणि टॅक्सी चालकांची प्रत्यक्ष पाहणी व तपासणी करतील.

प्रशासकीय पारदर्शकता आणि सुसूत्रता राखण्यासाठी परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आवश्यक त्या सर्व मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, आरटीओ पथकांकडून चालकांच्या मराठी भाषेची तपासणी आणि पडताळणी करताना संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग (छायाचित्रण) केले जाणार आहे, जेणेकरुन कारवाई दरम्यान कोणताही वाद किंवा गैरप्रकार उद्भवणार नाही.

दरम्यान केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे प्रमुख रामदास आठवले यांनी या कारवाईला विरोध दर्शवत परप्रांतीय चालकांना मराठी शिकण्यासाठी अधिक वेळ देण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात

### इंजिनिअर भरती निकालावर गदारोळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील २३५ रिक्त इंजिनिअर पदांच्या भरतीसाठी जाहीर झालेल्या तात्पुरत्या निकालावरून मोठा गदारोळ उडाला आहे. निकालात अनियमितता झाल्याचा दावा करत अनेक उमेदवारांनी तक्रारी दाखल केल्या असून, विरोधकांनीही काही संशयास्पद उमेदवारांच्या नावांची यादी समोर आणत थेट भरती प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वाढत्या संशयाच्या आणि विरोधाच्या पार्श्वभूमीवर प्राधिकरणाने अधिकृत भूमिका स्पष्ट करत संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी एका उच्चस्तरीय समितीची घोषणा केली आहे.

## मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा झालेल्या गावांना जलयुक्त शिवार ३.० मध्ये प्राधान्य मिळणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व



जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील. मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत.

जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले.

## महा वॉकेथॉनमध्ये सहभागी व्हा- जिल्हाधिकारी येरेकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जलसंधारणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अमरावती शहरात २१ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता 'महा वॉकेथॉन : 'वॉक फॉर वॉटर' चे आयोजन करण्यात आले आहे. क्युआर कोड व अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करून नागरिकांना सहभागी होता येणार आहे. वॉकेथॉनद्वारे जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन



जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

'एक पाऊल जलसंधारणासाठी, एक पाऊल शाश्वत भविष्यासाठी' हा संदेश सर्वदूर पोचविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने आयोजन केले आहे. श्री.शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयापासून या वॉकेथॉनला सुरुवात होणार असून पुढे गर्ल्स हायस्कुल चौक, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सिंचन भवन असा मार्ग असणार आहे. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथेच वॉकेथॉनचा समारोप होणार आहे.

जलसंधारणाच्या लोकचळवळीला बळ देण्यासाठी आयोजित या उपक्रमात नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि जलसंवर्धन क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तरुण पिढीला नशेच्या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – तरुण पिढी नशेच्या आहारी गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा तरुणांना नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या प्रवृत्तींना प्रतिबंधित करावे. तरुणांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांना सहानुभूतीने या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नशा मुक्त महाराष्ट्र धोरण सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत दिले.

नशामुक्त महाराष्ट्रासाठी शासकीय यंत्रणाचा दृष्टिकोन महत्वाचा ठरणार आहे. सर्व



संबंधित विभागांनी आपली जबाबदारी ओळखून प्रभावी भूमिका बजाविल्यास पुढील काळात निश्चितच नशामुक्त महाराष्ट्र घडविता येईल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली .

बैठकीला गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.

नशेच्या दुष्टचक्रात अडकलेल्या तरुणांना यामधून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती केंद्र कार्यान्वित करावीत. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या नशामुक्ती केंद्रांचे सक्षमीकरण करण्यात यावे. यासाठी आवश्यकता असल्यास निधीची तरतूद करण्यात यावी, अशा सुचनाही मुख्यमंत्री यांनी यावेळी दिल्या.



# संपादकीय

**विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली शिक्षणाचे महत्त्व जाणा.**

## राजकारणातील असुरक्षिततेचा मुखवटा

राजकारण हे केवळ सत्तेचे मैदान नाही; ते प्रतिमा, विचार, नेतृत्वक्षमता आणि जनविश्वास यांचीही कसोटी असते. त्यामुळे राजकीय नेत्यांच्या प्रत्येक विधाःाकडे आणि कृतीकडे समर्थक व विरोधक आपापल्या दृष्टिकोनातून पाहत असतात. राहुल गांधी यांच्या राजकीय भूमिकांबाबतही गेल्या काही काळात देशभरात मोठी चर्चा होत आहे. त्यांच्या वक्तव्यांवरून त्यांची राजकीय शैली, आक्रमकता आणि सरकारविरोधातील भूमिका यावर विविध मते व्यक्त केली जातात. मात्र, एखाद्या राजकीय नेत्याच्या भूमिकेचे विश्लेषण करताना त्याला थेट मानसिक असुरक्षिततेचे लेबल लावण्यापेक्षा त्यामागील राजकीय परिस्थिती समजून घेणे अधिक योग्य ठरते. राजकारणात 'असुरक्षितता' ही केवळ वैयक्तिक मानसिक अवस्था नसते. अनेकदा ती राजकीय परिस्थितीतूनही निर्माण होते. एखाद्या पक्षाला सलग पराभवांचा सामना करावा लागत असेल, जनाधार कमी होत असेल किंवा नेतृत्वासमोर संघटनात्मक आव्हाने उभी राहत असतील, तर त्या पक्षाच्या नेत्यांवर दबाव वाढतो. अशा वेळी भाषणांची तीव्रता वाढू शकते, सरकारवर अधिक आक्रमक टीका केली जाऊ शकते आणि स्वतःची राजकीय भूमिका ठळकपणे मांडण्याची गरज निर्माण होऊ शकते. राहुल गांधी यांच्याबाबतही अशाच राजकीय संदर्भातून चर्चा होणे आवश्यक आहे. भारतीय राजकारणात त्यांच्यावर अनेकदा नेतृत्वाच्या क्षमतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्याच वेळी त्यांच्या समर्थकांच्या मते त्यांनी सातत्याने सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केले असून सामाजिक आणि आर्थिक मुद्दे राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्या आक्रमक वक्तव्यांचे विश्लेषण करताना केवळ व्यक्तिमत्त्वावर निष्कर्ष काढण्याऐवजी त्यांच्या राजकीय भूमिकेचा विचार करणे आवश्यक आहे. मानसशास्त्रात असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्यावर व्यक्ती स्वतःची क्षमता सिद्ध करण्याचा प्रयत्न करते, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. मात्र, प्रत्येक आक्रमक वर्तनामागे मानसिक असुरक्षितता असते, असे म्हणणे योग्य नाही. आत्मविश्वास, राजकीय रणनीती, परिस्थितीचा दबाव, विरोधकांवर प्रभाव निर्माण करण्याची गरज किंवा आपल्या समर्थकांना सक्रिय ठेवण्याचा प्रयत्नया अनेक कारणांमुळे राजकीय भाषाशैली आक्रमक होऊ शकते. लोकशाहीमध्ये आक्रमक विरोध हा गैरप्रकार नाही. सत्ताधारी पक्षाच्या निर्णयांवर कठोर प्रश्न उपस्थित करणे, धोरणांवर टीका करणे आणि पर्यायी विचार मांडणे ही विरोधकांची मूलभूत भूमिका आहे. प्रश्न असा आहे की ही आक्रमकता तथ्यांवर आधारित आहे का? विरोधकांकडे पर्यायी धोरण आहे का? जनतेच्या प्रश्नांना तोडगा देण्यासाठी ठोस कार्यक्रम आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, राजकीय संघर्ष हा व्यक्तीविरोधात न राहता धोरणांच्या पातळीवर आहे का? भारतीय राजकारणात व्यक्तिकेंद्री संघर्षाचे प्रमाण वाढले आहे.




# विदेशी पैशांचा प्रवाह रोखताना लोकशाहीचा समतोल राखणार कोण?

केरळ विधानसभेने या विधेयकाविरोधात ठराव मंजूर केला, कॅथोलिक बिश'स कॉन्फरन्स ऑफ इंडियाने गृहमंत्र्यांची भेट घेतली, संयुक्त राष्ट्रांच्या तीन विशेष प्रतिनिधींनी चिंता व्यक्त केली आणि एका अमेरिकी काँग्रेस सदस्यानेही यावर भाष्य केले. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने हे भारताचे अंतर्गत विधिविषयक प्रकरण असल्याचे स्पष्टपणे बजावले. या साऱ्या गदारोळाच्या मुळाशी जो कायदा आहे, त्याचा प्रवास समजून घेतल्याशिवाय आजचा वाद नीट कळणार नाही.




एफसीआरएचा जन्मच मुळी संशयास्पद वातावरणात झाला. इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीच्या काळात, ३१ मार्च १९७६ रोजी हा कायदा अस्तित्वात आला. त्यावेळचे उद्दिष्ट होते, विदेशी शक्तींचा भारताच्या अंतर्गत राजकारणावर, निवडणुकांवर आणि सामाजिक चळवळींवर प्रभाव पडू नये यासाठी विदेशी निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे. गंमत अशी की, हा कायदा आणला काँग्रेसने आणि आज त्याच कायद्याच्या कठोर आवृत्तीवरून भाजपला आणीबाणीच्या मानसिकतेचा आरोप सहन करावा लागतो आहे.

१९८४ साली या कायद्यात सुधारणा करून परदेशी निधी स्वीकारणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवी संस्थेला गृह मंत्रालयाकडे नोंदणी सक्तीची करण्यात आली. पुढे २०१० साली, पुन्हा एकदा काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात, जुना कायदा रद्द करून नवा आणि अधिक कडक एफसीआरए, २०१० अस्तित्वात आला, जो २०११ पासून लागू झाला.

**विदेशी निधीचा दुरुपयोग?**

विदेशी निधीचा दुरुपयोग खरोखर होत होता का आणि तो कसा होत होता. स्वातंत्र्योत्तर काळात मध्य प्रदेश सरकारने १९५४ साली न्यायमूर्ती भवानी शंकर निगम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती, जिचा अहवाल १९५६ साली आला. या निगम समितीने आदिवासी भागांतील धर्मांतर आणि परदेशी मिशनरी निधी यांच्यातील संबंधांवर तपशीलवार भाष्य केले होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा यांच्या नावाखाली आर्थिक प्रलोभने देऊन धर्मांतर घडवले जात असल्याचा ठपका ठेवला होता.

पुढील दशकांत ओदिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, झारखंड यांसारख्या आदिवासीबहुल राज्यांनी स्वतंत्र धर्म स्वातंत्र्य कायदे (फ्रीडम ऑफ रिलिजन अ?ॅक्ट्स) आणले, जे बळजबरी किंवा प्रलोभनाने केल्या जाणाऱ्या धर्मांतरावर नियंत्रण ठेवण्यासाठी होते. १९९८ सालचे गुजरातमधील डांग जिल्ह्यातील ख्रिसमसच्या काळातील हिंसाचार आणि जानेवारी १९९९ मध्ये ओदिशातील मनोहरपूर येथे ऑस्ट्रेलियन मिशनरी ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांच्या दोन मुलांची जिवंत जाळून करण्यात आलेली हत्या, या दोन्ही घटनांनी धर्मांतर आणि विदेशी निधी हा विषय राष्ट्रीय पातळीवर पुन्हा तापवला. १९७६ पासून आजतागायत तब्बल वीस हजारांहून अधिक संस्थांचे एफसीआरए परवाने रद्द करण्यात आले आहेत, ज्यात अ?ॅम्नेस्टी इंटरनॅशनल आणि ऑक्सफॅम इंडियासारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संस्थांचाही समावेश आहे, हे सरकारच्या दाव्याला बळ देणारे आकडे आहेत.

**नवीन विधेयकात नेमकं काय?**

२०२६ सालचे सुधारणा विधेयक हे या साऱ्या पार्श्वभूमीवरचे सर्वात आक्रमक पाऊल मानले जाते. या विधेयकाचा गाभा आहे कलम १५ रद्द करून त्याजागी नवे प्रकरण तीन-अ समाविष्ट करणे, ज्याद्वारे केंद्र सरकार नियुक्त करणार असलेल्या एका 'नियुक्त प्राधिकरणा'ला (डेझिग्नेटेड ऑथॉरिटी) एफसीआरए परवाना रद्द झालेल्या किंवा नूतनीकरण न झालेल्या संस्थांची मालमत्ता ताब्यात घेण्याचे, तिचे व्यवस्थापन करण्याचे आणि विक्री करण्याचे व्यापक अधिकार दिले जाणार आहेत. शिवाय कलम ३५ मध्ये बदल करून जास्तीत जास्त पाच वर्षांची शिक्षा घटवून एक वर्षावर आणली जाणार आहे आणि कलम ४३ अन्वये राज्य यंत्रणांना एफसीआरएप्रकरणी तपास सुरू करण्यापूर्वी केंद्र सरकारची पूर्वपरवानगी बंधनकारक केली जाणार आहे, ज्यामुळे तपासाचे केंद्रीकरण अधिक घट्ट होईल.

२२ जून २०२६ रोजी गृह मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या नव्या नियमांत धर्मप्रसार (प्रोसेलिटायझेशन) हा शब्द वगळून सरकारचे अधिकार केवळ विदेशी निधीतून निर्माण झालेल्या मालमत्तेपुरते मर्यादित ठेवल्याचे स्पष्ट करण्यात आले, तरीही प्रार्थनास्थळांचे धार्मिक स्वरूप जपले जाईल असे आश्वासन विधेयकात नमूद असूनही ख्रिश्चन समुदायाची अस्वस्थता कमी झालेली नाही. ६ ऑगस्ट २०२६ रोजी ख्रिश्चन प्रतिनिधी मंडळाने गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन विधेयक मागे घेण्याची किंवा संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची मागणी केली; शहा यांनी चिंता ऐकून घेतल्याचे व त्यावर विचार करण्याचे आश्वासन दिले.

**विरोधकांचे म्हणणे काय?**

विरोधी पक्षांची भूमिका मात्र स्पष्टपणे विधेयकाबाबत संशयाची आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी हे विधेयक सध्याच्या स्वरूपात संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावे आणि प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक नेमावे, अशी मागणी मुंबईत पत्रकार परिषदेत केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सीमांकनाच्या मुद्द्यावरून आधीच सरकारला घेरले असताना, हे विधेयक संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील दुसरे मोठे संघर्षक्षेत्र बनले आहे. एका अमेरिकी काँग्रेस सदस्याने भारत-अमेरिका संबंधांवर याचा परिणाम होऊ शकतो असा इशारा दिला. यावर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ठाम भूमिका घेत सांगितले की भारताच्या विधिविषयक बाबींवर निर्णय घेण्याचा अधिकार केवळ भारताच्या संसदेला आहे आणि अमेरिकेसह अनेक देशांतही विदेशी निधीचे नियमन करणारे स्वतःचे कायदे अस्तित्वात आहेत.

**विदेशातील कायदे काय?**

अमेरिकेचा फॉरेन एजंट्स रजिस्ट्रेशन अ?ॅक्ट म्हणजे फारा हा १९३८ सालचा कायदा, नाझी प्रचारतंत्राला रोखण्यासाठी आणला गेला होता आणि आजही परदेशी सरकारांसाठी किंवा संस्थांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना नोंदणी सक्तीची करतो; या कायद्याचे उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाईचीही तरतूद आहे. रशियाने २०१२ पासून 'विदेशी एजंट' कायदा वापरून हजारो स्वयंसेवी संस्था व माध्यम संस्थांची गळचेपी केली आहे, तर ऑस्ट्रेलियानेही २०१८ साली विदेशी प्रभाव पारदर्शकता कायदा लागू केला. भारत सरकारचा युक्तिवाद हाच आहे की, प्रत्येक सार्वभौम राष्ट्राला विदेशी निधीचे नियमन करण्याचा अधिकार आहे. आजची वस्तुस्थिती अशी आहे की, विदेशी निधीच्या गैरवापराच्या ऐतिहासिक तक्रारींना पूर्णतः नाकारता येत नाही आणि त्याचबरोबर या नव्या विधेयकाद्वारे सरकारला मिळणारे 'नियुक्त प्राधिकरणा'चे अनियंत्रित अधिकार, न्यायालयीन पुनरावलोकनाची मर्यादित तरतूद आणि राज्य यंत्रणांच्या स्वायत्ततेवर घातलेली बंधने, हे लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक आहेत.

शिक्षण, आरोग्यसेवा, अनाथाश्रम यांसारख्या क्षेत्रांत दशकानुदशके काम करणाऱ्या ख्रिश्चन संस्थांना राष्ट्रविरोधी कारवायांच्या संशयातून मोजण्याची प्रवृत्ती जितकी अन्यायकारक आहे, तितकीच विदेशी निधीच्या नावाखाली होणाऱ्या संघटित धर्मांतर मोहिमांकडे कानाडोळा करणेही अवास्तव आहे. आता संयुक्त संसदीय समितीकडे विधेयक पाठवण्याची मागणी सरकारने मान्य केली.

# भारतातील रुग्णालयांचे दर हे हिमनगाचे टोक

आरोग्य ही माणसाची सर्वात मोठी संपत्ती मानली जाते. मात्र आजाःपण आले की हीच संपत्ती टिकवण्यासाठी सामान्य माणसाला आर्थिक संपत्ती पणाला लावावी लागते. भारतात रुग्णालयांमध्ये उपचार घेण्याचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याची भावना समाजात तीव्र होत आहे. मोठ्या शहरांतील खासगी रुग्णालयांमध्ये उपचारांचे दर पाहिल्यावर अनेक कुटुंबांना धक्का बसतो. परंतु रुग्णालयाचे बिल हा या संपूर्ण समस्येचा केवळ वरचा भाग आहे. त्याखाली औषधे, तपासण्या, प्रवास, कामाचे नुकसान, परिचराचा खर्च, कर्जाचा भार आणि मानसिक तणाव अशा अनेक अदृश्य खर्चांचा मोठा डोंगर दडलेला असतो. म्हणूनच 'भारतातील रुग्णालयांचे दर हे हिमनगाचे टोक' असे म्हणणे योग्य ठरेल.




एखाद्या व्यक्तीला अचानक गंभीर आजार झाला किंवा अपघात झाला, तर कुटुंबासमोर सर्वप्रथम उभा राहतो तो उपचाराचा प्रश्न. जीव वाचविणे हेच प्राथमिक उद्दिष्ट असल्याने त्या क्षणी पैशाचा विचार दुय्यम ठरतो. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर विविध तपासण्या, औषधे, डॉक्टरांची फी, बेडचे शुल्क, शस्त्रक्रिया, आयसीयू, वैद्यकीय उपकरणांचा वापर अशा अनेक बाबींचे बिल वाढत जाते. सुरुवातीला अपेक्षित असलेला खर्च काही दिवसांत मोठ्या रकमेत बदलतो. परिणामी मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो.

रुग्णालयातील खर्चाचा प्रश्न केवळ खासगी आरोग्यव्यवस्थेपुरता मर्यादित नाही. सरकारी रुग्णालयांमध्ये उपचार तुलनेने परवडणारे असले तरी अनेक ठिकाणी डॉक्टरांची कमतरता, उपकरणांचा अभाव, रुग्णांची मोठी संख्या, प्रतीक्षा कालावधी आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादा जाणवतात. त्यामुळे ज्यांना आर्थिक क्षमता आहे ते खासगी रुग्णालयांचा पर्याय निवडतात; पण ज्यांच्याकडे पैसा नाही, त्यांना अनेकदा सरकारी व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागते.

आरोग्यसेवेचा वाढता खर्च समजून घेताना औषधांच्या किमतींचाही विचार करावा लागतो. काही उपचारांमध्ये दीर्घकाळ औषधे घ्यावी लागतात. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, कर्करोग किंवा इतर दीर्घकालीन आजारांमध्ये औषधांचा खर्च कुटुंबाच्या मासिक अर्थसंकल्पावर मोठा परिणाम करू शकतो. रुग्णालयातून बाहेर पडल्यानंतरही उपचार संपत नाहीत. फॉलो-अप, औषधे, तपासण्या आणि आहारातील बदल यामुळे खर्च सुरूच राहतो.

तपासण्यांचा खर्च हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. आज आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे अनेक आजारांचे निदान अधिक अचूकपणे करता येते. विविध रक्तचाचण्या, इमेजिंग, स्कॅन, विशेष तपासण्या आणि इतर निदान पद्धतींमुळे डॉक्टरांना उपचार करणे सोपे होते. मात्र या सुविधांचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहे का, हा प्रश्न विचारणेही आवश्यक आहे. आवश्यक तपासणी आणि अनावश्यक तपासणी यातील फरक रुग्णाला समजणे अनेकदा कठीण असते.

याच ठिकाणी पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण होतो. रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांना उपचाराची गरज, संभाव्य खर्च, पर्यायी उपचारपद्धती आणि त्यातील जोखीम याबाबत स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. रुग्णाला प्रत्येक निर्णयामागील कारण समजले, तर उपचार प्रक्रियेत त्याचा सहभाग वाढतो आणि गैरसमज कमी होतात.

आरोग्य विम्याचे महत्त्व यामुळे अधिक वाढते. गंभीर आजार किंवा मोठी शस्त्रक्रिया झाल्यास विमा कुटुंबाला आर्थिक संरक्षण देऊ शकतो. मात्र विमा असणे आणि संपूर्ण खर्च विम्याने भरला जाणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेकदा काही उपचार, औषधे, तपासण्या किंवा इतर खर्च पॉलिसीच्या अटींनुसार वेगळे असू शकतात. त्यामुळे विमा घेताना त्यातील अटी, मर्यादा आणि कव्हरेज समजून घेणे गरजेचे आहे.

भारतासारख्या मोठ्या देशात आरोग्यसेवेतील आर्थिक विषमता ही गंभीर समस्या आहे. महानगरांमध्ये अत्याधुनिक रुग्णालये, विशेषज्ञ डॉक्टर आणि आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत; परंतु ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना अनेकदा प्राथमिक उपचारांसाठीही लांबचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे रुग्णालयाचा खर्च एवढाच प्रश्न नसतो. रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांचा प्रवास, राहण्याचा खर्च, जेवण, औषधे आणि कामावर होणारा परिणाम यांचाही आर्थिक भार वाढतो.

गरीब कुटुंबासाठी आजारपण म्हणजे दुहेरी संकट असते. एका बाजूला उपचाराचा खर्च वाढतो आणि दुसऱ्या बाजूला कुटुंबातील कमावणारी व्यक्ती रुग्णाची काळजी घेत असल्यामुळे उत्पन्न कमी होऊ शकते. काही वेळा उपचारासाठी कर्ज घ्यावे लागते. कर्ज फेडण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यामुळे एका आजाराचा परिणाम पुढील अनेक वर्षांच्या कौटुंबिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. महिलांच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. अनेक कुटुंबांमध्ये महिलांच्या आजारावर उपचार घेण्यास उशीर केला जातो. घरातील इतर खर्चांना प्राधान्य देताना महिलांच्या आरोग्याच्या समस्या दुर्लक्षित केल्या जातात. आजार गंभीर झाल्यानंतर उपचाराचा खर्च आणखी वाढतो.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# योगीराज बाबा आश्रम येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – श्री सद्गुरु योगीराज बाबा आश्रम हनुमान पेठ मुसळखेडा येथे दरवर्षीप्रमाणे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यातआला.

या कार्यक्रमाची सुरुवात रमेश धोटे यांचे हस्ते सकाळी ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी योगीराज माऊलींचे भक्त, सेवेकरी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला



मानवंदना देऊन राष्ट्रगीत गायले. यावेळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण करण्यात आले तसेच देशाची एकता, अखंडता आणि प्रगती यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय व आनंदी वातावरणात उत्साहात पार पडला. याप्रसंगी श्री योगीराज बहुउद्देशीय संस्था व श्री योगीराज महिला विकास संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नॅशनल इंग्लिश स्कूल येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरूड** – नॅशनल इंग्लिश स्कूल येथे ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात रितीने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणुन डॉ.अश्विनी कुणाल बिजवे तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होत्या. याप्रसंगी जयंत गोंडसे,




प्रकाश आगरकर, डॉ.मधुरा ठाकरे, डॉ.प्रांजली झरबडे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य सेनानींची वेशभूषा परिधान करुन सर्वांचे लक्ष वेधुन घेतले.

इयत्ता १ ते ८ च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे दिली आणि देशभक्तीपर गीते सादर केली. गायनाचा संपूर्ण कार्यक्रम संगीत शिक्षक राजेंद्र गोरले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. मुख्याध्यापक विनोद भोंगाडे आणि सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्वांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शेवटी वंदेमातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

# धीतीझ किडझी आणि धीतीझ ग्लोबलमध्ये स्वातंत्र्य दिन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – धीतीझ किडझी आणि धीतीझ ग्लोबल स्कूल येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन समारोह मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला व्यवस्थापक सागर जयस्वाल, सदस्य प्रशांत भंडारे, मुख्याध्यापिका परिणीता जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेच्या प्रांगणात प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ.चरण सोनारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने संपूर्ण वातावरण देशभक्तीने



भारावुन गेले.१५ ऑगस्ट १९४७ हा भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्र बनले. त्यामुळे संपूर्ण देशात हा दिवस मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जातो, असे डॉ.चरण सोनारे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषणे, देशभक्तीपर गीतांचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली आणि स्वातंत्र्य दिनाचा सोहळा संस्मरणीय केला.

या कार्यक्रमाचे संचालन मेघा यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदुरजनाघाट द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी योगीराज मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष भिमराव कावनपुरे, अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी मुख्याध्यापक भाऊराव हरले यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

याप्रसंगी विद्यालयाचे व्यवस्थापक एहराज फैसल, रसूल मिस्तरी, शेख अमर, मेहमूद मिस्तरी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपआपली कला सादर करुन देशभक्ती जागृत करण्याचा प्रयत्न केला.



# शांतीनिकेतन इंग्रजी शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्य ध्वजारोहण उत्साहात

## माजी मुख्याध्यापिका सुनंदा खोले यांची उपस्थिती

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील शांतीनिकेतन इंग्रजी शाळेत स्वातंत्र्य दिन व ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विवेक ठवळी होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी मुख्याध्यापिका सुनंदा खोले उपस्थित होत्या. उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख व गणेश अस्सलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीताने वातावरण देशभक्तीमय झाले होते. नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या महत्त्व




सांगणारी विविध भाषणे सादर केली. प्रमुख पाहुण्या सुनंदा खोले यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचे महत्त्व देशाप्रती असलेली जबाबदारी आणि राष्ट्रप्रेम याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन गौरव मोडक तर आभार अर्पिता वाडबुधे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# 'वाढत्या वयाचा अर्थ असुरक्षितता किंवा अपमान असा होऊ नये..'

## पालक आपल्या मुलांना मालमत्तेतून बेदखल करू शकतात : सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पालक आपल्या मुलांना त्यांच्या मालमत्तेतून बाहेर काढू शकतात. वाढत्या वयाचा अर्थ असुरक्षितता किंवा अपमान असा होऊ नये.

प्रत्येक व्यक्तीला आयुष्यभर सन्मानाने जगण्याचा हक्क असल्याचा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. सर्वोच्च



न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचा आदेशही रद्द केला असून ज्यामध्ये एका न्यायाधिकरणाने मुलगा आणि सुनेला त्यांच्या घरातून बाहेर काढण्याचा आदेश रद्द केला होता. न्यायालयाने म्हटले आहे की, ज्येष्ठांच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी मुलांना मालमत्तेतून बाहेर काढण्याचा आदेश देण्याचा अधिकार न्यायाधिकरणाला आहे.

लखनौमधील घराचा वाद सुप्रीम कोर्टापर्यंत न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, कायद्याचा उद्देश ज्येष्ठांचा सन्मान आणि सुरक्षा सुनिश्चित करणे हा आहे.

एका सुसंस्कृत समाजाचा दर्जा अनेकदा तो समाज आपल्या ज्येष्ठांना देत असलेल्या सन्मान, आदर आणि सुरक्षेवरून ठरवला जातो.

# पेपर तयार करणाऱ्या ६०० तज्ज्ञांची उचलबांगडी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – नॅशनल टेस्टिंग एजन्सी संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी छढअ ने मोठी कारवाई केली आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने आपल्या परीक्षा विभागाची पुनर्रचना केली असून, यात ६०० तज्ज्ञांना हटवून नवीन तज्ज्ञांची नियुक्ती केल्याची माहिती आहे. दरम्यान, एनटीएचे




नवीन कार्यालय मिंटो रोड येथे असेल, अशी देखील माहिती आहे.

तर, केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी एनटीए सोबत बैठक घेतली आणि परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी सर्व आवश्यक सुरक्षा आणि संबंधित पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

शिक्षण मंत्र्यांच्या निर्देशांनुसार, एनटीएच्या महासंचालकांनीही एनटीएने केलेल्या कार्यवाहीचा तपशील दिला, अशी देखील माहिती आहे.

६०० तज्ञांच्या जागी नवीन तज्ञांची नियुक्ती करून परीक्षा पथकाची पुनर्रचनाएनटीएने सांगितले की, ६०० तज्ञांच्या जागी नवीन तज्ञांची नियुक्ती करून परीक्षा पथकाची पुनर्रचना करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिकांची छाननी अधिक मजबूत करण्यासाठी चार-स्तरीय प्रश्नपत्रिका तपासणी प्रणाली लागू केली जाईल.

# रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी बोलता न आल्यास 'बॅज' निलंबित करणार

## परिवहन मंत्री सरनाईक : आज पासून राज्यभरात अंमलबजावणी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य असून, या नियमाची अंमलबजावणी २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना प्रथम एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास त्यांचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज व परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात



येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. राज्यातील रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने गेल्या १०५ दिवसांपासून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' राबविण्यात आले. या अभियानाला सुमारे १ लाख ६५ हजार ६०० अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी प्रतिसाद देत मराठीचे प्रशिक्षण घेतले. ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये पद्मश्री, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत सहभागी चालकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. या सर्व चालकांचे परिवहन मंत्री म्हणून सरनाईक यांनी अभिनंदन केले.

# आसमंत स्नेहालयातील चिमुकल्यांसोबत खासदार अमर काळे यांचा वाढदिवस

## मायेच्या भेटीने फुलले बालमन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वर्धा** – येथील केशव सिटी सिंदी (मेघे) यांच्या परिसरात शिवाजी चौधरी यांच्या पुढाकारातून चालविण्यात येत असलेल्या 'आसमंत स्नेहालय' आश्रमाला खासदार अमर काळे यांनी १७ ऑगस्ट रोजी भेट देत तेथील निराधार, अनाथ आणि गरजूंची आस्थेने विचारपूस केली.

यावेळी चिमुकल्यांनी खासदार अमर काळे यांचा वाढदिवस केक कापून मोठ्या उत्साहात साजरा



केला.

आसमंत स्नेहालयामध्ये आई-वडिलांचे छत्र हरपलेली मुले, बालपणी बेवारस अवस्थेत सापडलेली मुले तसेच ज्यांचा सांभाळ करण्यासाठी कोणीही नाही, अशा निराधार व्यक्तींना आश्रय दिला जातो. याशिवाय आधाराची गरज असलेल्या ज्येष्ठ व्यक्ती आणि मनोरुग्णांचाही आसमंत स्नेहालयामध्ये सांभाळ केला जात असल्याची माहिती संस्थेचे संचालक शिवाजी चौधरी यांनी खासदार अमर काळे यांना दिली.

खासदार काळे यांनी आसमंत स्नेहालयाची संपूर्ण पाहणी करून तेथील प्रत्येक व्यक्तीची आस्थेने चौकशी केली. मुलांशी संवाद साधताना त्यांच्या जीवनातील संघर्षाची माहिती जाणून घेतली. या मुलांच्या जीवनातील परिस्थिती आणि त्यांना मिळत असलेला आधार याबाबतची माहिती ऐकताना खासदार काळे भावुक झाले.

यावेळी चिमुकल्यांनी उत्साहाने केक कापून खासदार अमर काळे यांचा वाढदिवस साजरा केला. मुलांसोबत काही काळ घालविताना खासदार काळे यांनीही त्यांच्या आनंदात सहभागी होत संवाद साधला. 'या मुलांसोबत काही क्षण का होईना, वेळ घालवता आला आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविता आले, याचे समाधान आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

आसमंत स्नेहालयामध्ये समाजातील दुर्लक्षित आणि निराधार घटकांना मायेचा आधार देण्याचे काम सुरू असल्याचे पाहून खासदार अमर काळे यांनी शिवाजी चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. समाजातील निराधारांना आधार देणारा स्नेहालयाचा उपक्रम निश्चितच स्तुत्य आणि अनुकरणीय आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सुधीर पांगुळ नगराध्यक्ष, संदीप किटे, प्रकाश कांबळे, प्रणय कदम, यांच्यासह स्नेहालयातील कर्मचारी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्कूल ऑफ स्कॉलर्समध्ये स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साहात साजरा, अनेकांची उपस्थिती

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – स्कूल ऑफ स्कॉलर्स या शाळेमध्ये नुकताच स्वातंत्र्य दिन माजी सैनिक नितीनआकोटकर व डॉ.निखील पवार यांच्या उपस्थितीमध्ये अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण तसेच महामानवांच्या पुजनाने आणि विद्यार्थ्यांकडून मानवंदना देऊन करण्यात आली. याप्रसंगी के.जी.२ ची विद्यार्थीनी अबिहा खान, हिरण्या काळमेघ, साम्राज देशमुख, सावी वानखडे, सुहानी क्षिरसागर, कार्तिक भटकर, कुंज पटेल, इयत्ता दुसरी मधून क्रियांश भोयर, मोहिका गाडगे, काव्या काकडे, शाश्वती देशमुख, इयत्ता तिसरी व चौथी मधून रियांश पटेल, निष्का धाडसे, सारीमुद्दिन काझी, देवेश्वरी जयस्वाल, निवेदिता वानखडे, हिताक्षी सराटकर यांनी भाषणे आणि बहारदार गीते केली.

मुख्याध्यापक सुनीतकुमार दुबे यांनी प्रास्ताविकातून स्वातंत्र्य दिनाची विशेषता आणि या दिवसाचे महत्व पटवून दिले.

विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीत, आकर्षक नृत्य सादर केले. त्यानंतर विद्यार्थी पुष्कर मानकर आणि विद्यार्थिनी विधी झाडे यांनी लघुनाटिका सादर केली. रेवा चौधरी हिने सर्व विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी मनोगतातून देशसेवेत असतांना आपल्या प्रवासातील काही अनुभव सांगितले आणि सर्व विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ.निखील पवार यांनी विध्यार्थ्यांचे देशाप्रती काय कर्तव्य आहे? हे सांगीतले. शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील सी.बी.एस.ई.बोर्डाच्या परिक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले त्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन अदिती बिजवे व अर्णव चव्हाण यांनी तर आभार क्रिष्णा शेळके याने मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक सुनीतकुमार दुबे, उपमुख्याध्यापिका रिया तिडके, शैक्षणिक समन्वयक रुपाली काळे, किर्ती बोंडे, प्रशासन अधिकारी सुशील उघडे, अमोल कोल्हे, कार्यक्रम प्रमुख भावना गणोरकर, निलेश विधाते, निकीता गायकवाड, अमित गौतम, कपिल तरार, सचिन चौधरी, तिलक तिवारी, दर्शना रेवतकर, भावना खुजे, उत्कर्ष देशमुख, रोशनी गोरडे, गौरी नेरकर, गौरव गडवे, स्वाती निकम, मनिषा विटाळकर, अर्पणा भागवतकर, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी परिषदेचे सर्व सदस्य, बॅन्ड गृपचे सर्व विद्यार्थी तसेच वंश सातव, साक्षांत गोडबोले, अर्णव श्रीराव, नंदन गणोरकर, रितुल देशमुख यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम अतिशय उत्साहाच्या वातावरणामध्ये संपन्न झाला.



# यशवंत माऊलींच्या आगमनाच्या पारंपरिक सोहळ्यानिमित्त धार्मिक उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**प्रमोद बोंदरकर** – येथील श्री शंकर देवस्थान परिसरात यशवंत माऊलींच्या आगमनाच्या पारंपरिक सोहळ्यानिमित्त चांदस ग्रामवासीयांच्या वतीने दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदाही हा धार्मिक उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.

नागपंचमीच्या पाडव्याच्या पवित्र दिवशी माऊली गावावरून गुरुवर्य जिचकार गुरुजी यांच्या विनंतीवरुन यशवंत माऊलींचे चांदस येथील श्री शंकर देवस्थानात आगमन झाले होते. या पारंपरिक व श्रद्धेच्या सोहळ्याची आठवण जपत ग्रामस्थ दरवर्षी माऊलींच्या स्वागताचा उत्सव साजरा करतात. यंदाच्या उत्सवातही मोठ्या संख्येने भाविक व ग्रामस्थ सहभागी झाले.

उत्सवाच्या आदल्या दिवशी खंजेरी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

त्यानंतर आज रोजी भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यशवंत माऊलींच्या पालखीची विधिवत पूजा करुन पालखी सोहळ्यास सुरुवात झाली. भक्तिमय वातावरणात पालखी मिरवणुक काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, महिला, युवक तसेच भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'यशवंत माऊलींचा जयजयकार' अशा जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

या सोहळ्यामुळे चांदस गावातील धार्मिक व सामाजिक एकोपा अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पालखी सोहळ्यानंतर चांदस ग्रामवासीयांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, युवक मंडळ व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. यशवंत माऊलींच्या या पारंपरिक उत्सवामुळे चांदस गावातील श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडले. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.



# उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कारांसाठी अर्ज आमंत्रित : जिल्हा ग्रंथालय संचालकांचे आवाहन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वर्धा** – राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय



पुरस्कार तसेच डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येणार आहेत. इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवकांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह २५ सप्टेंबरपर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे तीन प्रतीत पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे केले आहे. या पुरस्कारांचा उद्देश शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास घडवून आणणे, जनतेला अधिकाधिक ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे हा आहे. शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार, ५० हजार व २० हजार रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट प्रदान करण्यात येईल.

राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथसेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रदीर्घकाळ सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांना व सेवकांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल, असे ग्रंथालय सहाय्यक संचालकांनी कळिवले आहे.

# अल्पवयीनाने वाहन चालवून अपघात केल्यास कठोर कारवाई

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वर्धा** – अल्पवयीन मुलांना मोटार वाहन कायद्याचे आवश्यक ज्ञान व वाहन हाताळण्याची त्यांची बौध्दीक क्षमता विकसित झाली नसल्याने त्यांच्याद्वारे अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे अल्पवयीनांना वाहन चालविण्यास देणारे वाहन मालक, जबाबदार व्यक्ती किंवा ज्यांच्याकडे वाहनाचा ताबा आहे, अशा व्यक्तींवर दंडात्मक व कायदेशिर कारवाई होऊ शकते. त्यामुळे अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात १८ वर्षाखालील व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन चालविणे कायद्याने प्रतिबंधित आहे. मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ४ नुसार १८ वर्षाखालील व्यक्तीला मोटार वाहन चालविता येत नाही. अपवादात्मक म्हणुन १६ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तीस ५० सीसीपेक्षा जास्त क्षमता नसलेली मोटार वाहन कायद्यातील अटी व शर्ती पूर्ण केल्यास चालविता येते.

अल्पवयीन व्यक्तीने मोटार वाहन चालवून अपघात केल्यास वाहन मालक, जबाबदार व्यक्ती किंवा ज्याच्याकडे वाहनाचा ताबा आहे, अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई होवून त्याच्यावर कमाल ३ वर्षापर्यंत कारावास आणि २५ हजार रुपये पर्यंत दंड होऊ शकतो. अशा प्रकरणात मोटार वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र निलंबित करण्याची तरतूद असून कायद्यानुसार त्या अल्पवयीन व्यक्तीस २५ वर्षे वय पूर्ण होईपर्यंत ड्रायव्हिंग, लर्नर लायसन्स मिळण्यास अपात्र ठरविण्याची तरतूद आहे. वाहन मालकाने किंवा वाहनाचा ताबा असलेल्या व्यक्तीने कायदेशीर वय किंवा पक्के लायसन्स नसलेल्या व्यक्तीला वाहन चालविण्याकरिता दिल्यास कलम १८० व १८१ कारावास, दंड किंवा दोन्ही होऊ शकतात.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६९०/२०२६** **ने.ता.२९/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) संजय मारोतराव मुंगभाते, वय अं.४९ वर्ष, धंदा-शेती
२) विजय मारोती मुंगभाते, वय अं.४५ वर्ष, धंदा-शेती
३) कैलास मारोती मुंगभाते, वय अं.४२ वर्ष, धंदा-शेती
क्र.१ ते ३ रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मारुती उर्फ मारोती गणपत मुंगभाते व मयत कमला मारोती मुंगभाते, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६८७/२०२६** **ने.ता.२८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

रेखा खुशालराव नागले
वय अं.४७ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.खडका, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत खुशाल नामदेराव नागले, रा.खडका, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६८८/२०२६** **ने.ता.१५/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) शंकर महादु धुर्वे, वय अं.७० वर्ष, धंदा-शेती
२) गुणीता सुरजलाल उईके, वय अं.५८ वर्ष, धंदा-घरकाम
रा.मुलताई, ता.मुलताई, जि.बैतुल
३) निर्मला सखाराम धुर्वे, वय अं.६८ वर्ष, धंदा-घरकाम
४) रंजीत सखाराम धुर्वे, वय अं.४४ वर्ष, धंदा- शेती
क्र.१, ३ व ४ रा.रवाळा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत महागु सकरु धुर्वे, रा.रवाळा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१५/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# ग्रामपंचायत अधिकाऱ्याचा मृत्यू : शासनाने उपाययोजना कराव्यात

## सरपंच संघनेच्या जिल्हाध्यक्ष रोशनी निंभोरकर यांची मागणी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभा सुरु असतांना ग्रामपंचायत अधिकारी पी.एन.पाटील यांचा झालेला दुर्दैवी मृत्यु ही अत्यंत गंभीर, वेदनादायी व नोकरशाही व्यवस्थेला हादरुन सोडणारी घटना आहे, या घटनेबद्दल ग्राम संवाद सरपंच संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अमरावती जिल्हातील सर्व सरपंच संघटनेच्या तीव्र दु:ख व्यक्त करीत आहोत, अशा घटना यापुढे होवु नये म्हणुन शासनाने उपाययोजना कराव्या अशी मागणी सरपंच संघनेच्या जिल्हाध्यक्ष रोशनी निंभोरकर यांनी केली आहे.

यासंदर्भात रोशनी निंभोरकर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद केले आहे की, सदर घटनेच्या निषेधार्थ



जिल्ह्यातील सर्व सरपंच संघटनेचाआम्ही पाठिंबा देत आहे. ग्रामपंचायत आधिकारी, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितेचा गंभीर प्रश्न लक्षात घेता ग्राम संवाद सरपंच असोसिएशन या भुमिलेला ठाम व पुर्ण पाठिंबा जाहीर करीत आहे. ग्रामसभा ही भारतीय संविधानाने मान्यता दिलेल्या स्थानिक स्वराज्य व्यवस्थेतील अत्यंत महत्वाची लोकशाही संस्था आहे.

गावातील विकास कामे, शासकीय योजना, विविध कामे लाभार्थी निवड, सामाजिक प्रश्न हे महत्वाचे निर्णय ग्राम सभेतून घेतले जातात, त्यामुळे ग्रामसभा नियमितपणे होणे आवश्यक आहे. त्याचवेळी ग्रामसभेत सहभागी होणाऱ्या सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी , ग्रामस्थांच्या जीविताची व सुरक्षितेची जबाबदारी तरी योग्य निर्णय घेऊन या घटनेवर विचार करून योग्य न्याय द्यावा, अशी मागणी सरपंच संघनेच्या जिल्हाध्यक्ष रोशनी निंभोरकर यांनी केली आहे.

# जरुड हायस्कूल व पी.जी.राऊत कनिष्ठ महाविद्यालय येथे बाल शालेय संसद निवडणुक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**जरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित जरुड हायस्कूल, जरुड व पी.जी.राऊत क.म.वि. येथे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मुल्यांची जाणीव निर्माण व्हावी, नेतृत्वगुण विकसित व्हावेत तसेच निवडणुक प्रक्रियेची प्रत्यक्ष ओळख व्हावी, या उद्देशाने बाल शालेय संसद निवडणुक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

निवडणुक प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी




मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मतदानानंतर मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडली आणि विजयी उमेदवारांची घोषणा करण्यात आली. बाल शालेय संसदेमध्ये विविध जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. मुख्यमंत्री आदित्य राऊत, उपमुख्यमंत्री सौरभ धर्माळे, शिक्षण मंत्री वैशाली वानखडे, क्रीडा मंत्री अंजली डोंगरे, स्वच्छता व आरोग्य मंत्री सेजल उईके, सांस्कृतिक मंत्री गौरी दहिवाडे, शिस्त व वाहतुक मंत्री कन्हैया ढोक.

प्राचार्य ओमप्रकाश दुपारे यांचे मार्गदर्शनाखाली प्रा.सारीका लांडगे यांनी बालसंसद निवडणुक प्रक्रिया जबाबदारीने पार पाडली . याकरिता सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवुन बाल शालेय संसद उपक्रम यशस्वी केला.

## राज्यात नव्या पोलीस ठाण्यांसाठी सुधारित निकष

# पोलीस ठाण्यांची ‘अ’, ‘ब’, ‘क’ वर्गवारी निश्चित

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिक आणि तांत्रिक विकास, पर्यटन, वाहतूक, गुन्हेगारीचे बदलते स्वरूप तसेच सायबर गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीसाठी मनुष्यबळाचे सुधारित निकष आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत.

नव्याने स्थापन होणाऱ्या पोलीस ठाण्यांची ‘अ’, ‘ब’ आणि ‘क’ अशी वर्गवारी करण्यात आली असून, त्यानुसार मनुष्यबळ निश्चित केले जाणार आहे. गृह विभागाने मंगळवारी याबाबतचा




शासन निर्णय जारी केला.

सध्या पोलीस ठाण्यातील मनुष्यबळ १९६० मध्ये निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार कार्यरत आहे. जुन्या निकषांनुसार पोलीस ठाण्यांवरील मनुष्यबळ अपुरे पडते. याशिवाय नवीन पोलीस ठाण्यांसाठी मनुष्यबळाचे प्रमाणक आणि मार्गदर्शक तत्त्वे ऑगस्ट २०२३ मध्ये निश्चित करण्यात आली होती.

जिल्हा मुख्यालयातील पोलीस ठाणे, संवेदनशील मिश्रवस्तीची लोकसंख्या ३५ टक्क्यांपेक्षा अधिक असलेले क्षेत्र, ‘अ’ वर्ग तीर्थक्षेत्रात मोडतील.

१५० ते २०० गुन्ह्यांसाठी ‘क’ वर्ग

भारतीय दंड विधानातील भाग १ ते ५ मधील १५० ते २०० गुन्हे असलेल्या पोलीस ठाण्यांना ‘क’ वर्ग देण्यात येईल. या वर्गासाठी स्वतंत्र मनुष्यबळाचे प्रमाणक निश्चित करण्यात आले आहे. नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याच्या प्रस्तावात मागील तीन वर्षांतील संबंधित क्षेत्रातील गुन्ह्यांची संख्या हा अनिवार्य निकष असेल.

याशिवाय मार्गदर्शक तत्त्वांमधील किमान सात ते आठ निकष पूर्ण होणे आवश्यक करण्यात आले आहे. मुंबईतील नव्या पोलीस ठाण्यांसाठी ३६२ मनुष्यबळाची मर्यादा मुंबई पोलीस आयुक्तालयाला या वर्गवारीतून वगळण्यात आले आहे.

# संत्रा खरेदी दरम्यान संत्रा ग्रेडींग दाण्यामध्ये दुजाभाव

## संत्रा उत्पादक बागायतदार शेतकऱ्यांची वरिष्ठांकडे तक्रार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – तालुक्यातील सर्व संत्रा प्रोड्युसर कंपन्या शेतकऱ्यांना योग्य दर देत नसुन संत्रा ग्रेडींग दाण्यामध्ये खरेदी करण्यात फसवणुक होवुन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, अशी तक्रार संत्रा उत्पादक बागायतदार शेतकऱ्यांनी वरिष्ठांकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुका हा संत्रा उत्पादनाकरीता विदर्भाचा कॅलिफोर्निया म्हणुन सुपरिचीत आहे. निसर्गाचा लहरीपणा, अतिवृष्टी, गारपीट, व्यापाऱ्यांची पिळवणुक




इत्यादीमुळे शेतकरी आधिच होरपळला आहे, असे असतांना तालुक्यातील संत्रा प्रोड्युसर कंपन्या ग्रेडींगमध्ये शेतकऱ्यांच्या नावावर शासनाकडून अनुदान घेत असून शेतकऱ्यांशीच मनमर्जीप्रमाणे दुजाभाव करीत आहे. संत्रा दाणा ग्रेडींग मध्ये ९६, १४१, १७१, १९१ दाणा हा ठरलेल्या बाजारभावानुसार घेतल्या जातो परंतु २०५ दाणा ग्रेडींग करुन निघालेल्या एकुण संत्रा मालापैकी केवळ २० टक्केच माल खरेदी केल्या जाते.

त्यामुळे उर्वरीत ८० टक्के संत्रा दाणा २०५, २२५ हा माल कवडीमोल दराने घेतल्या जातो. त्यामुळे शेतकरी दोन्ही बाजूने विवंचनेत सापडलेला असतो. त्यामुळे यावर शासन स्तरावर सर्व सबंधित विभागाची बैठक बोलावुन शेतकऱ्यांच्या प्रश्नावर समाधान काढण्यात यावे, हि नम्र विनंती.

अन्यथा तिव्र आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, असा ईशारा मनिष धोटे, चंद्रकांत बोडनासे, अंकुश बोडनासे, सतिश धोटे, राजेंद्र देशमुख, निलेश कुंभारे, पिंट कोरडे यांनी दिला आहे.




